महाराष्ट्र पोलीस

पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर
तीन हात नाका, एल.बी.एस.मार्ग, नौपाडा, ठाणे (पश्चिम)
दुरध्वनी क्रमांक – ०२२–२५४०१०५६
Email ID – cp.thane.dcptraffic@mahapolice.gov.in

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

जा.क्र. पोउपआ/वावि/अधिसूचना/ ६९ /२०२४ दि. ०६/०४/२०२४

## –: वाहतूक नियंत्रण अधिसूचना :–

**ज्याअर्थी,** कल्याण डोंबिवली महानगरपालिका कार्यक्षेत्रात **डोंबिवली** वाहतूक उपविभागाचे हद्दीत दि. ०९/०४/२०२४ रोजी डोंबिवली पुर्व शहरात श्री गणेश मंदिर संस्थान, डोंबिवली पुर्व यांचे वतीने स्वागतयात्रा भागशाळा मैदान, डोंबिवली पश्चिम येथुन सुरू होवुन कोपर ब्रिज मार्गे शिव मंदीर रोड–चार रस्ता–बाजीप्रभु चौक–फडके रोड, डोंबिवली पूर्व येथे येणार आहे. सदर वेळी बाजीप्रभू चौक, फडके रोड, मदन ठाकरे चौक, गणपती मंदीर, आप्पा दातार चौक येथे **'गुढीपाडवा'** सणानिमित्त नववर्षे स्वागतयात्रेकरीता नागरिक मोठया संख्येने उपस्थित राहून सण साजरा करतात. सदर स्वागतयात्रेत लेझीम पथक, सनई चौघडा, भजन, दिंड्या, अनेक चित्ररथ तसेच सर्व प्रांतीय परिवार, संप्रदाय, समाज मंडळे समाविष्ट होणार आहेत. सदर परिसरात वाहतूक कोंडी होऊ नये व परिसरातील वाहतूक सुरळीत व सुनिश्चित राहणे आम जनतेच्या सोईसाठी आवश्यक आहे.

**त्याअर्थी,** मी **डॉ. विनयकुमार मे. राठोड, पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर** म्हणून, मला महाराष्ट्र शासन गृहविभाग क्र. एम.व्ही.ए.–११६/सीआर/३७/टीआर, दि. २७/०९/१९९६ चे अधिसुचनेनुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६ (१) (अ) (ब) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करून पुढीलप्रमाणे अधिसूचना जारी करीत आहे. :–

**प्रवेश बंद –** १) फडके रोडवरील बाजीप्रभू चौक ते आप्पा दातार चौक पर्यंत येणा–या सर्व प्रकारच्या वाहनांना **संपूर्ण फडके रोड** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग –** सदर वाहने ठाकुर्ली जोशी हायस्कूल समोरील रोडने नेहरू रोड मार्गे स्टेशन कडे तसेच फडके रोड कडे येणारी वाहने टिळक रोड, सावरकर रोड, इंदिरा चौक मार्गे व स्टेशन परिसरात इच्छित स्थळी जातील.

**प्रवेश बंद –** घरडा सर्कल डोंबिवली पूर्व कडून कल्याण रोडने टिळक चौक कडे येणा–या खाजगी बसेस व अवजड वाहनांना **घरडा सर्कल** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग –** सदर खाजगी बसेस व अवजड वाहने घरडा सर्कल येथे यु टर्न घेवून इच्छित स्थळी जातील.

**प्रवेश बंद –** डोंबिवली पश्चिम कडून कोपर ब्रिजवरून डोंबिवली पूर्व कडे जाणा–या वाहनांना **कोपर ब्रिज** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग –** सदर वाहने महात्मा फुले रोडने बावन चाळ, नवीन ठाकुर्ली ब्रिजवरून डावे वळण घेवून व्ही. पी. रोडने इच्छित स्थळी जातील.

**प्रवेश बंद –** घरडा सर्कल डोंबिवली पूर्व येथून कल्याण रोडने टिळक चौक मार्गे येणारी के.डी.एम.टी. व एन.एन.एम.टी. चे बसेसना **टिळक रोड** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग –** सदर के.डी.एम.टी व एन.एन.एम.टी. बसेस आर.पी. रोड मार्गे चार रस्ता पाटणकर चौक येथून डावे वळण घेवून मानपाडा रोड मार्गे इच्छित स्थळी जातील.

**पार्किंग –** सदर कार्यक्रमास येणाऱ्या वाहनांना पार्किंगकरीता नेहरू मैदान येथे पार्किंगची व्यवस्था करण्यात आलेली आहे.

सदर वाहतूक अधिसूचना दि. ०९/०४/२०२४ रोजी सकाळी ०४:०० ते १३:०० वाजेपावेतो अंमलात राहील.

सदर वाहतूक नियंत्रण अधिसूचना पोलीस वाहने, फायर ब्रिगेड, रुग्णवाहिका व इतर अत्यावश्यक सेवेतील वाहनांना लागू राहणार नाही.

( डॉ. विनयकुमार मे. राठोड )
पोलीस उप आयुक्त,
वाहतूक विभाग, ठाणे शहर.

**प्रति,**

जिल्हा माहिती अधिकारी, जिल्हा माहिती अधिकारी कार्यालय, ठाणे.

२/– सदर अधिसूचना प्रसिध्द करण्यास विनंती आहे.

**प्रत माहितीसाठी सविनय सादर,**

मा. पोलीस आयुक्त, ठाणे शहर

मा. पोलीस सह आयुक्त, ठाणे शहर

मा. जिल्हाधिकारी, ठाणे

**प्रत कार्यवाहीस्तव,**

मा. अपर पोलीस आयुक्त, पूर्व प्रादेशिक विभाग, कल्याण.

प्रादेशिक परिवहन अधिकारी, कल्याण.

पोलीस उप आयुक्त, परिमंडळ–३, कल्याण.

पोलीस उप आयुक्त, विशेष शाखा, ठाणे.

परिवहन व्यवस्थापक, कल्याण–डोंबिवली महानगरपालीका, कल्याण

विभाग नियंत्रण कक्ष, राज्य परिवहन विभाग, कल्याण

नियंत्रण कक्ष, ठाणे/कल्याण शहर

**प्रत** :– पोलीस उप आयुक्त, आर्थिक गुन्हे शाखा, ठाणे शहर

२/– सदर अधिसूचना नागरिकांच्या माहितीसाठी ठाणे शहर पोलीस वेबसाईटवर प्रसिध्द होणेस विनंती आहे.

**प्रत कार्यवाहीस्तव सविनय सादर,**

मा. आयुक्त, कल्याण–डोंबिवली महानगरपालिका, कल्याण

**प्रत** :– समन्वय अधिकारी, ९ ए. एस. कक्ष, ठाणे.

२/– सदर अधिसूचना पोलीस नोटीसमध्ये प्रसिध्दीसाठी.

**प्रत** :– स.पो.आ. कल्याण वाहतूक विभाग/पोनि डोंबिवली, कोळशेवाडी, कल्याण वाहतूक उपविभाग.